राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -५१/२०२६/सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे

तक्रारदार	उत्तरवादी- जन माहिती अधिकारी, पदनाम व कार्यालय
जाधव सचिन	नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी उपविभाग बारामती कार्यालय,जि. पुणे.

(आदेश दिनांक १६.०७.२०२६)

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०२.२०२६ रोजी कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारदार यांनी केलेल्या तक्रार अर्जाची तपासणी केली असता हा तक्रार अर्ज आयोगाकडे कलम १९(३) अन्वये दाखल द्वितीय अपील प्रकरणी आयोगाचा निर्णय होण्यापूर्वी कलम १८ अन्वये तक्रार अर्ज केले असल्याचे दिसून आले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने, मुख्य माहिती आयुक्त व इतर विरुद्ध मणिपूर राज्य सरकार, सिव्हील अपील क्र. १०७८७-१०७८८/२०११ या प्रकरणी दि. १२.१२.२०११ रोजी दिलेल्या न्याय निर्णयामध्ये कलम १८ ची प्रक्रिया स्पष्ट केली आहे. तसेच या आदेशाच्या परिच्छेद ३५ मध्ये असे स्पष्ट केले आहे की, अपिलार्थी/ तक्रारदार यांनी माहिती मिळविण्यासाठी कायद्याने ठरवून दिल्यानुसार कलम १९ मधील विहित केलेल्या अपील प्रक्रिये नुसार आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक आहे. तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९(३) अन्वये आयोगास द्वितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या तक्रार अर्जाची तपासणी केली असता या तक्रार प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कलम १९ मधील विहित केलेल्या अपील प्रक्रियेचा अवलंब न करता व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश विचारात न घेता आयोगाकडे कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल केली आहे असे स्पष्ट होत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेता तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत दाखल केलेला तक्रार अर्ज मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाशी सुसंगत नसल्याने, सदर तक्रार अर्ज विना कार्यवाही निकाली काढण्यास पात्र आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. सबब आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत .

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक -५१/२०२६/सातारा जावक.क्र - 3603 दिनांक- 418126